# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 28-05-2024

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कुही ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-05-28 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2024-05-29 | 2024-05-30 | 2024-05-31 | 2024-06-01 | 2024-06-02 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 45.2 | 45.4 | 44.6 | 42.9 | 42.6 |
| किमान तापमान (अं.से) | 30.0 | 30.1 | 28.4 | 28.5 | 28.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 44 | 42 | 40 | 40 | 39 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 26 | 24 | 21 | 18 | 19 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 7 | 6 | 6 | 5 | 6 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 295 | 300 | 297 | 296 | 307 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 5 | 5 | 6 | 6 | 3 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक२९ मे ते ०२ जून २०२४ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक २९, ३०, ३१ मे व ०१ आणि ०२ जून २०२४ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता, • पुढील २ दिवसांत विदर्भात कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही त्यानंतर २ अंश सेल्सिअस ने वाढेल. • पुढील ५ दिवसांत विदर्भात किमान तापमानात फारसा बदल होणार नाही.

### कृषि सल्ला:

• खरीप भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता गादी वाफ्यावर (रोपवाटिका) बियाणे पेरावे. मिरची, वांगी, टोमाटो यांच्या बियाण्यास ट्रायकोडर्मा या बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करून योग्य अंतरावर ओळीत टाकावे. • पावसाळ्यात शेतातील पाणी जागेवरच मुरविण्यासाठी तसेच अवघावासोबत मौल्यवान मातीचा थर वाहून जाऊ नये म्हणून जमिनीची मशागत (नांगरणी, वखरणी) करताना मुख्य उतारला आडवी किंवा समतल रेषा काढून (कंटूर) या रेषेला समांतर करावी. • वाढलेले तापमान लक्षात घेता, शेतीमधील महत्वाची कामे हि सकाळी ११ वाजता पूर्वी करण्यास प्राधान्यद्यावे.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• उन्हाळी भाजीपाला पिकाचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी ग्रीन शेड नेट चा वापर करावा.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • कपाशीची मान्सून पूर्व लागवड टाळावी. • गुलाबी बोंडअळीचे जीवनचक्र खंडित करण्यासाठी मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेल्या शेतात पीक न घेता त्या ठिकाणी पिक फेरपालट करावी. • कापूस हे गुलाबी बोंडअळीचे एकमेव यजमान खाद्य वनस्पती आहे, म्हणून पीक |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | फेरपालट केल्यास या किडीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होते. • रोग प्रवण शेतात मातीजन्य रोग आणि सूत्रकृमीचा निरीक्षणासाठी पीक फेरपालट खूप प्रभावी आहे. |
| सोयाबीन | • योग्यतेनुसार, शेतकऱ्यांना सब-सॉयलर चा दर ५ वर्षातून एकदा १० मीटरच्या अंतराने चालवावा. जज्यामुळे जमिनीचा खालील कडक झालेला थर फोडण्यास मदत होते त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीमध्ये पाणी झीरपण्याचा दर वाढतो आणि दुष्काळाच्या परिस्थितीत मदत होते. • सोयाबीन पिक उत्पादनात स्थैर्यता टिकून राहण्यासाठी शेताची २ ते ३ वर्षातून एकदा खोल नांगरणी करावी त्यानंतर वखराच्या २ ते ३ आडव्या उभ्या पाळ्या द्याव्यात आणि नंतर सपाट करून घ्यावी. • शेवटच्या वखराच्या पाळी पूर्वी २.५ टन कोंबडी खत प्रती हेक्टरी किवा ५ ते १० टन चांगले कुजलेले शेणखत प्रती हेक्टरी जमिनीत मिसळावे. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन लागवडीसाठी रुंद वरंबा सरी किंवा सरी वरंबा तंत्रज्ञानाच अवलंब करावा. • खते, तणनाशके, बुरशीनाशके आणि बीज प्रक्रियेसाठी लागणारी जीवाणू संवर्धने इत्यादी महत्वाच्या निविष्ठांची उपलब्धता सुनिश्चित करावी. • बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी अपेक्षित रोपांची संख्या साध्य करण्यासाठी बियाण्याची उगवण क्षमता किमान ७० % एवढी असावी. |
| भुईमूग | • खरीप भुईमुग लागवडीकरिता मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी, भुसभुशीत, वाळू मिश्रित चिकन माती व सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. भुईमुग लागवडीकरिता जमिनीचा १५ ते २० सेंमी चा थर भुसभुशीत असणे आवश्यक आहे. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी ५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. |
| तूर | • तूर पिक लागवडीकरिता शेतजमीन तयार करावी. तूर पिकाचे चांगल्या प्रतीचे बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून/प्रमाणित बियाणे धारकाकडूनच करावी. |
| ऊस | • फेब्रुवारी महिन्यात लागवड केलेल्या सुरु उसाला (८ ते १० आठवड्यांनी) हेक्टरी २ पोती युरिया देऊन ओलीत करावे. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. • ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १७ ते ७४ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला १०२ ते १६६ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १८७ ते २३५ लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. • फळ गळ व्यवस्थापनासाठी जिब्रेलिक आम्ल १.५ ग्राम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे आंबिया बहार चांगला येण्यास मदत होते. (जिब्रेलिक आम्ल पाण्यात मिसळण्या पूर्वी १० मिली अल्कोहोल मध्ये मिसळावे). • फळ बागांमध्ये प्रौढ अवस्थेतील रस शोषक किडीच्या व्यवस्थापनासाठी ३० पिवळे चिकट सापळे (३० x ४० सेंमी आकाराचे व आठवड्याच्या अंतराने स्टीकर म्हणून एरंडी तेलाचा वापर करावा) प्रती एकर १.५ ते २ मीटर जमिनीपासून उंचीवर लावावे. • डिंक्या प्रभावित भागाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आतील भागास इजा होणार नाही याची काळजी घेऊन डिंक बाहेर पडतो भाग धारधार चाकूने किंवा पटाशीने खरडून त्या भागावर मेफेनोक्झाम* एमझेड ६८ (५० ग्राम) किंवा फोसेटील एएल (५० ग्राम) १ लिटर पाण्यात मिसळून पेस्ट तयार करून प्रादुर्भाव ग्रस्त भागावर लावावी. ३० दिवसाच्या अंतराने पुन्हा हि पेस्ट लावावी. |
| कोबी | • पावसाचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य कोबी व फुल कोबीच्या गड्ड्याची काढणी करून विक्री करावी. • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी १३ मिली किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवा स्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| टोमॅटो | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता फळांची गळ व होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावीव झाडांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • टमाटे पिकामध्ये नागअळी, मावा, फुलकिडे, पंढरी माशी व फळे पोखरणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १८.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मिरची | • वाढलेले तापमान व ढगाळ हवामान लक्षात घेता, मिरची पिकामध्ये फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मी.ली., प्रती ९ लिटर पाण्यात मिसळून मिरची लागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी. • सद्यपरिस्थितीत मिरची पिकावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणाकरिता, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. बैल व इतर जनावरांकडून सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजेदरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. चरण्यासाठी सकाळी किंवा संध्याकळी सोडावे. |
| गाय | • दुभत्या गाईस ८ किलो वाळलेला चारा आणि ६ किलो हिरवा चारा आणि १ किलो खुराक द्यावा. खुराक मिश्रण करतांना मका, ज्वारी, बाजरी, गव्हाचा कोंडा, यांचा वापर करावा. खुराकात २० ग्राम प्रती किलो खनिज मिश्रण मिसळावे. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • कोंबड्यांच्या शेड ला कापडी पडदे लावावे तसेच हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| माती चाचणी | • रब्बी पिके काढलेल्या शेताची त्वरित नांगरणी करावी, यामुळे जमीन तापण्यास मदत होऊन किडीचे कोष व घातक बुरशीचा नायनाट होण्यास मदत होईल व पेरणीसाठी जमिनीची मशागत चांगली होईल. माती परीक्षणासाठी मातीचे नमुने काढून ते अधिकृत किंवा शासकीय मृदा परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षण अहवालानुसार पिक परत्वे कृषी निविष्ठा चे नियोजन करावे. |
| सामान्य सल्ला | • शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. • बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |